Rotary 2020-2021

# southern star ...अवघे धरू सुपंथ

The official bulletin of Rotary Club of Pune South

Year : 51, Vol : 8, February 2021

**THE BOAT IS SAFER**
**ANCHORED AT THE PORT...**
**BUT THAT'S NOT**
**THE AIM OF THE BOAT....**

**PAULO COELHO**

**President :** Rtn. Sudarshan Natu | **Secretary :** Rtn. Manisha Belgaonkar | **Editor :** Rtn. Yogesh Nandurkar

## *Peace and Conflict Prevention/Resolution Month*

Rtn. Abhijit Deshpande (AB)

Enjoy listening....

February is a very important month for Rotary. It was on the 23rd February 1905, that Rotary is founded at Unity Building, Chicago, Illinois, United States of America.

As a humanitarian organisation, peace is a cornerstone of Rotary's mission and as such, the month of February is celebrated as Peace and Conflict Prevention/Resolution Month.

Millions of people all over the world are currently displaced by armed conflict or persecution. Most of the casualties in any conflict are civilians. Women and children are the worst affected.

Through service projects and Rotary programs, Rotary is committed to pursuing projects that address the structural causes of conflict, including poverty, inequality, ethnic tension, lack of access to education, and unequal distribution of resources.


An interesting initiative as part of this mission for better cultural and ethnic understanding and tolerance is the 'Rotaract Model United Nations Mission.'

'Rotaract MUN' is an annual international Model United Nations conference for youth participants from all over the world. Originally founded by the Rotaract Club of Baia Mare in Romania, each edition of 'Rotaract MUN' takes place in a different country and is organised by a different Rotaract Club (Rotary in Action Programme).

Since 2013, editions of 'Rotaract MUN have been held in Romania, United Kingdom, Serbia, USA (at the UN HQ), Bulgaria, Lebanon and India.

What a novel and innovative approach involving youth - the future citizens and decision-makers - in fostering a peaceful and understanding global community.

## *Rotary's New Vision Statement and Action Plan*




Rotary's Board of Directors and Trustees have approved a new vision statement that will help set a future course for Rotary to thrive in the years ahead.

This vision statement was created by using the input and feedback from Rotary members, former members, Rotaractors, alumni, Youth Exchange students, Rotary staff, and the general public. In all, over one million people across the world were asked to share their insights with the Strategic Planning Committee through surveys and focus groups. The result is a statement that inspires and engages while setting the pathway for the future of our organization. The vision was approved by the Rotary Board of Directors and Board of Trustees in June 2017.

Shortly after the vision statement was adopted, the Committee began developing Rotary's new Action Plan. Again, the Committee invited reactions and input from Rotary members; over 582 people from 28 different countries participated in focus groups and interviews to provide feedback. In June 2018, both boards approved the strategic priorities and objectives that make up the new Action Plan.

This is Rotary's Action Plan through 2024: to increase our impact, expand our reach, enhance participant engagement, and increase our ability to adapt....

Dr. Francis "Tusu" Tusubira, Rotary Club of Kampala-North, Uganda expands on the four strategic priorities, and the rationale behind them, in his 2019 International Assembly speech.

Enjoy Watching....

- रोटरीनं प्रत्येक महिना विशिष्ट कामासाठी योजला आहे. त्याबद्दल महत्त्व आणि काय करायचं हे सांगणारं पान
- शिवाय रोटरी इंटरनॅशनलबद्दल काही विशेष

**रोटरी**

तुमचा लेख आवर्जून द्या..
समन्वयक
योगेंद्र नातू / अभिजित देशपांडे

## *District 3131*
## *Rakshak Project*




As part of Rotary's fight against COVID-19, District 3131 initiated the Rakshak Project. The project comprised of providing barrier screens in auto-rickshaws, with the dual aim of protecting the rickshaw drivers and passengers from the infection as well as to spread awareness about ways to prevent COVID-19. The screen also carried the name of the sponsoring club as well as the sponsors.



Rotary Club of Pune South actively participated in this project by fixing 80 rickshaws with these screens. Special thanks to Mrs. Bahar Tepan of India Curries (https://indiacurrys.com) and Mr. Keskar of Kanak Jaggery (https://www.kanakjaggery.com) for sponsoring this socially important project.

Rtn. Abhijit Deshpande and Pres. Rtn. Sudarshan Natu, both were instrumental in getting the sponsorship.

Our club also put up some banners highlighting our Plasma Donation Project.

Overall a very good Public Image initiative for us.

## रश्मी उवाच

**रो. डीजी रश्मी कुलकर्णी**

*२६ जानेवारी २०२१*
ऐकण्यासाठी क्लीक करा...

*१९ जानेवारी २०२१*
ऐकण्यासाठी क्लीक करा...

*१२ जानेवारी २०२१*
ऐकण्यासाठी क्लीक करा...

*५ जानेवारी २०२१*
ऐकण्यासाठी क्लीक करा...

## रोटरी – डीजींच्या नजरेतून...

**(लेखमाला – दैनिक संध्यानंद)**

Rotary | Rotary Opens Opportunities

भाग- १३

बहुतेक रोटेरियन हे आपापल्या व्यवसायात यशस्वी झालेले असतात, कारण संधी दार ठोठवायला लागली की तिचा फायदा कसा करून घ्यायचा आहे, हे त्यांना पूर्ण अवगत असते व ते त्याप्रमाणे फायदा करून घेतातही. तसेच प्रत्येक साप्ताहिक बैठकीच्या वेळी मैत्रीची संधी दार ठोठावत असते. साप्ताहिक सभा हा रोटरी कार्यक्रमातला महत्त्वाचा दुवा आहे. कारण, अशावेळी क्लबच्या सदस्यांशी मैत्री वाढवणे, आपले अनुभव त्यांना ऐकवणे व त्यांचे ऐकून घेणे व या सर्वांतून मैत्री करण्याची सुवर्णसंधी येत असते. याचा फायदा करून घेतल्याने आपलाच किती फायदा होतो हे अनुभवायेच लागेल.

District Governor रश्मी कुलकर्णी, District 3131
रो.गिरीश लांडगे, ९४२२०१४९४४
District Executive Secretary 2020-21 RID 3131
रोटरी क्लब ऑफ पुणे कोथरूड

Rotary | Rotary Opens Opportunities

भाग- १४

डिस्ट्रिक्ट गव्हर्नर हे एक अनुभवी रोटेरियन असतात. स्वयंसेवी वृत्तीने आपल्या जीवनातील एक संपूर्ण वर्ष ते रोटरीसाठी वाहून घेतात. रोटरी परिवारात डिस्ट्रिक्ट गव्हर्नर महत्त्वाची कामगिरी बजावतात. डिस्ट्रिक्ट या रोटरींच्या विभागात एका विशिष्ट भौगोलिक भागातील रोटरी क्लब्ज एकत्र केलेले असतात. गव्हर्नर हे रोटरी इंटरनॅशनलचे अधिकृत अधिकारी म्हणून कार्य करतात. आजच्या घटकेला जगामध्ये सुमारे ५३४ गव्हर्नर्स असून, त्यांचा कालावधी एक वर्षाचा (१ जुलै ते ३० जून) असतो. त्यांना इंटरनॅशनल असेंब्लीमध्ये खास प्रशिक्षण दिले जाते.

District Governor रश्मी कुलकर्णी, District 3131
रो.गिरीश लांडगे, ९४२२०१४९४४
District Executive Secretary 2020-21 RID 3131
रोटरी क्लब ऑफ पुणे कोथरूड

Rotary | Rotary Opens Opportunities

भाग- १५

ज्या रोटरी फाउंडेशनबद्दल आपण बोललो त्याची सुरुवात एका छोट्या रकमेतून झाली. रोटेरिअन्स आर्च क्लम्फ यांनी १९१७ मध्ये जगाच्या कल्याणासाठी नफाविरहित एक ट्रस्ट असावा, अशी कल्पना मांडली. गोळा केलेली रक्कम होती २६.५० डॉलर्स! १९४७ पर्यंत यात मुंगीच्या गतीने वाढ सुरू होती. पण १९४७ साली रोटरीचे संस्थापक पॉल हॅरिस यांचे निधन झाले आणि त्यांच्या स्मरणार्थ एक हजार डॉलरची देणगी देणाऱ्यांना पॉल हॅरिस फेलो असा पुरस्कार देण्याचे ठरले. आजमितीस जगात १० लाखांहून अधिक पॉल हॅरिस फेलो आहेत.

District Governor रश्मी कुलकर्णी, District 3131
रो.गिरीश लांडगे, ९४२२०१४९४४
District Executive Secretary 2020-21 RID 3131
रोटरी क्लब ऑफ पुणे कोथरूड

दैनिक संध्यानंदमध्ये रोज ठराविक पेजवर रोटरी विषयक माहिती प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्यासाठी डीजी रश्मी कुलकर्णी यांचे काही खास लेख.

## *Covid Vaccination Drive*

Rtn. Sandeep Vilekar






कोव्हिड लसीकरण मोहिम

| अ.क्र. | लसीकरण ठिकाणे नाव | क्षेत्रिय वैद्यकीय अधिकारी | मोबाईल क्रमांक |
|---|---|---|---|
| 1 | सुतार हॉस्पिटल, कोथरुड | डॉ. अंजली रिकेकर | 9350020010 |
| 2 | कमला नेहरु हॉस्पिटल | डॉ. गोपाळ उत्पणकर | 9665154272 |
| 3 | राजीव गांधी हॉस्पिटल, येरवडा | डॉ. माया लोहार | 9689931966 |
| 4 | बी.जे. मेडिकल कॉलेज | डॉ. विजय बडे | 9881398048 |
| 5 | नोबेल हॉस्पिटल, हडपसर | डॉ. स्नेहल काळे | 9970942878 |
| 6 | भारती हॉस्पिटल, धनकवडी | डॉ. विद्या नागमोडे | 9860313526 |
| 7 | स्वी हेल्थ क्लिनिक | डॉ. संदीप घेंडे | 9689931726 |
| 8 | दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल | डॉ. अरुणा तारडे | 9823514644 |

District Administration needed Rotary Volunteers for Covid vaccination launch scheduled on Saturday, 16th January 2021.

RC Wagholi is the first club under District 3131 to conduct the Covid Vaccination Drive Project.

As Task Force Member in District Collector Team, Rtn Sandip Vilekar was requested to help District Administration by arranging volunteers at 39 locations where this Vaccination will be administered to Frontline Health Professionals, who stood strong during the pandemic to Serve us, in spite of the high risk.

It's time to stand by them and help the District Administration as a Volunteer. Let's live by the motto 'Service above Self.'

A link of a form is attached below. Members can choose the centre of their convenience and time between 8:00 to 5:30 pm.

https://survey.zohopublic.in/zs/8XDjJk


The data collected through these forms will be submitted to the office of District Collector.






## रोटरी वॉटर ऑलंपियाड




डिस्ट्रिक्ट सिनर्जी क्लब्स आणि शब्दसह्याद्री फाउंडेशन यांनी एकत्रितरित्या 'राष्ट्रीय जलमित्र वक्तृत्व स्पर्धा २०२१' ही अखिल भारतीय स्तरावरची सर्वांत जास्त पारितोषिकं असणारी खुली वक्तृत्व स्पर्धा आयोजित केली होती.

रोटरी क्लब पुणे साऊथ या सिनर्जी क्लब्सपैकी एक आहे. रोटरी क्लब सिंहगड रोडने या कार्यक्रमाची संपुर्ण जबाबदारी घेतली आहे.

स्पर्धेची अधिक माहिती पुढील लिंकवर उपलब्ध आहे. www.rotarywaterolympiad.org

## रोटरी मिक्स विंटर कप २०२१





१५ जानेवारी २०२१ रोजी झालेल्या क्रिकेट स्पर्धेमध्ये रोटरी क्लब पुणे साऊथतर्फे रो. ऋषिकेश बडवे आणि रो. निरंजन ठाणगावकर हे सहभागी झाले होते. रो. ऋषिकेशनी सर्वांना लोकेशन आणि टीमची नावं कळवली. रो. ऋषिकेश बडवे आणि रो. निरंजन ठाणगावकर हे दोघेही दोन वेगवेगळ्या टीममध्ये असल्यानं रोटरी क्लब पुणे साऊथच्या सदस्यांनी दोघांच्याही टीमला सपोर्ट आणि चियर अप केलं.

काही तांत्रिक बाबींमुळं सामना सतरा ओव्हर्सनंतर दिसू शकला नसला तरी प्रत्यक्षात शेवटच्या चेंडूपर्यंत चाललेला सामना टाय झाला. टाय -ब्रेकर ओव्हरमध्ये रो. निरंजन ठाणगावकर रन आऊट झाल्यामुळे सामन्याचा निकाल निश्चित करण्यासाठी सुपर ओव्हर खेळली गेली.

सुपर ओव्हरमध्ये 'क्यु-बील' संघानं सामना जिंकला. रो.निरंजन ठाणगावकरचा संघ 'लवास' हा उपविजयी ठरला.






लवास रॉयल आणि अल्टिमेट ॲडव्हेंचर्स यांच्यामध्ये झालेला सामना खालील लिंकवर जाऊन बघता येईल.

**व्हिडिओ इथे पाहा...**


वणी वॉरिअर्स विरुद्ध बश्री बास्टर्स यांच्यामध्ये झालेला सामना खालील लिंकवर जाऊन बघता येईल.

**व्हिडिओ इथे पाहा...**

लवास रॉयल आणि वणी वॉरिअर्स यांच्यामध्ये झालेला सामना खालील लिंकवर जाऊन बघता येईल.

**व्हिडिओ इथे पाहा...**

## *Covid India National Task Force*




PP Rtn. Surendra Jain, RCP Central is selected as an Advisory Board Member on Rotary India Vaccination Task Force.

PDG Rtn. Rajeev Pradhan (Dst 3132) is selected as Zonal Coordinator on Rotary India Vaccination Task Force.

CONGRATULATIONS!

## वाडे बोल्हाई आरोग्य केंद्रास उपयोगी वस्तू भेट



अवतीभवती

वाडेबोल्हाई : प्राथमिक आरोग्य केंद्रास विविध उपयोगी वस्तू देताना मान्यवर.

### वाडेबोल्हाई आरोग्य केंद्रास विविध उपयोगी वस्तू भेट


वाघोली : ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्था सुधारण्यासाठी रोटरी क्लब ऑफ वाघोली यांनी रोटरी क्लब ऑफ पुणे साउथ व वाघोली हाउसिंग सोसायटीज असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने वाडे-बोल्हाई प्राथमिक आरोग्य केंद्राला विविध उपयोगी वस्तूंची भेट दिली. पाणी शुद्धीकरण यंत्र, व्हील स्ट्रेचर, संगणक व प्रिंटर आदी साहित्यांचा यामध्ये समावेश आहे. याप्रसंगी सुदर्शन नातू, संजीवकुमार पाटील, जुगनू दोशी, गुरुदास शेट्टी, अजय परदेशी, सचिन सोनवणे, गिरीश महतानी, सिराज दोकडिया, आदित्य सरोहा, योगेश सूर्यवंशी, बाळासाहेब सातव, कुशाबा गावडे, दीपक गावडे, महेश वाडदरे आदी मान्यवर उपस्थित होते.

लोकमत

### वाडेबोल्हाई आरोग्य केंद्रास वस्तू भेट

वाघोली : ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्था सुधारण्यासाठी रोटरी क्लब ऑफ वाघोली यांनी रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथ आणि वाघोली हाऊसिंग सोसायटीज असोसिएशन यांच्या सहभागाने वाडेबोल्हाई प्राथमिक आरोग्य केंद्र येथे पिण्याच्या पाण्याचे आरओ, व्हील स्ट्रेचर, संगणक आणि प्रिंटर भेट देण्यात आले. यावेळी सुदर्शन नातू, संजीवकुमार पाटील, जुगणू दोसी, गुरुदास शेट्टी, अजय परदेशी, सचिन सोनवणे आदी उपस्थित होते.

Hello Pune Gramin
Page No. 3 Jan 08, 2021
Powered by: erelego.com




Annets, Interact, Rotract Groups and School Groups participated in District Youth Festival.

All the participants enjoyed the event.

Dear Fellow
Rotarians and Anns,

The District Conference for this year is being held at the same venue as last year which is very close to us.

The conference fees are also minimal. It is an appeal to all to register in large number for this Conference.





➢ आपला क्लब रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१ मध्ये येतो.
➢ डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रश्मी कुलकर्णी यांचा संवाद
➢ या डिस्ट्रिक्टमधील विविध प्रोजेक्ट्स, कार्यक्रम
➢ डिस्ट्रिक्टमधील क्लब्सचे महत्त्वाचे, दखलपात्र असे प्रोजेक्ट्स

**डिस्ट्रिक्ट कनेक्ट**

तुमचा लेख आवर्जून द्या...
समन्वयक
योगेंद्र नातू / अभिजित देशपांडे

## द फॅसिनेटिंग वर्ल्ड ऑफ डिझाईन

**व्याख्याते – श्री. श्रीरंग गोखले**

दिनांक – ४ जानेवारी २०२१




चार जानेवारीला झालेल्या साप्ताहिक सभेत रो.प्रे. सुदर्शन नातू यांनी सर्व उपस्थितांचं स्वागत केलं. प्रोग्रॅम कमिटीचे चेअरमन रो. मंदार पूर्णपात्रे यांनी साप्ताहिक सभेचे व्याख्याते श्री. श्रीरंग गोखले यांची ओळख करून देताना सांगितलं की, बालपणी पुण्यातल्या वाडा संस्कृतीत राहिलेले श्री. श्रीरंग गोखले मेकॅनिकल इंजिनीअर आहेत. शिक्षण पूर्ण झाल्यावर प्रॉडक्ट इंजिनीअर या पदावर ते 'फिलीप्स'मध्ये रुजू झाले. पस्तीस वर्षं कंपनीला सेवा दिल्यानंतर 'आर न्ड डी' या विभागाचे 'विभागप्रमुख' या पदावरून ऑडिओ विभाग भोसरी इथून सेवानिवृत्त झाले. 'डिझायनींग' या क्षेत्रात सखोल अभ्यास असलेले आणि चाळीस वर्षं या क्षेत्रात काम करून भरीव योगदान दिले आहे.

उपलब्ध साधनांचा जास्तीतजास्त उपयोग करून एखादी वस्तू अथवा सेवा तयार करण्याचं प्लॅनींग करणं म्हणजे डिझाईन... अत्याधुनिक संशोधन आणि प्रगत तंत्रज्ञान यांपासून उच्च दर्जाचं प्रॉडक्ट निर्माण करणं तेव्हाच शक्य होतं जेव्हा संपूर्ण प्रक्रियेचं डिझायनींग उत्तमप्रकारे झालेलं असतं. डिझायनींगचे खूप प्रकार आहेत, जसे की प्रॉडक्ट डिझायनींग, इंडस्ट्रीअल डिझायनींग, इंटीरिअर डिझायनींग, कॉस्च्यूम डिझायनींग, फॅशन डिझायनींग, इत्यादी.

मार्केटचा अभ्यास, त्यानुसार प्रॉडक्टचं डिझाईन करणं, तयार प्रॉडक्ट्स वितरीत करणं आणि प्रॉडक्ट्सच्या विक्रीपश्चात सेवा देणं या सगळ्या पायऱ्यांमध्ये डिझायनींगचं असलेलं महत्त्व श्री. गोखले सरांनी सोप्या शब्दांत समजावून सांगितलं. एखाद्या प्रॉडक्टमध्ये त्याच्या विक्रीपश्चात जाणवणाऱ्या त्रुटी आणि येणाऱ्या अडचणी यांवर गोखले सर विस्तृतपणे बोलले. वेगवेगळी उदाहरणं देऊन त्यांनी हा मुद्दा समजावून सांगितला.

डिझायनींगमध्ये क्रिएटीव्हिटीचं महत्त्व अनन्यसाधारण आहे. माणसाचा उजवा मेंदू क्रिएटीव्ह काम करतो. तो सतत कार्यरत राहावा म्हणून वेगवेगळी कोडी सोडवणं, निरनिराळी पुस्तकं वाचणं, एखाद्या गोष्टीवर मनन चिंतन करून

त्याबद्दल वेगवेगळ्या लोकांशी चर्चा करणं यांसारख्या गोष्टी करून उजव्या मेंदूला व्यायाम द्यायला हवा असं गोखले सर सुचवतात. कुतूहल, जिज्ञासा, सकारात्मक दृष्टिकोन, खुल्या विचारांचं स्वागत करणारा मोकळा स्वभाव, नवनवीन गोष्टींची आवड या सगळ्या गुणांची डिझायनींगसाठी आवश्यकता असते असं आपलं भाषण संपवताना गोखले सरांनी सांगितलं.

या अभ्यासपूर्ण भाषणानंतर रो.अभिजित देशपांडे, रो.संजीव ओगले, रो.अरूण कुदळे, भाग्यश्री गुंफेकर यांनी डिझायनींगबाबतचे आपले प्रश्न गोखले सरांना विचारले आणि सरांनीही त्यांची मोकळेपणानं उत्तरं दिली. रो.प्रे.सुदर्शन नातू यांनी श्री. श्रीरंग गोखले यांचे आभार मानले आणि या साप्ताहिक सभेची सांगता झाली.

**व्हिडिओ इथे पाहा...**

## पुण्यातील नद्यांची ओळख, आव्हाने आणि काळजी

**व्याख्याता – सौ. शैलजा देशपांडे**

दिनांक – १८ जानेवारी २०२१

अठरा जानेवारीला झालेल्या साप्ताहिक सभेत रो. प्रे. सुदर्शन नातू यांनी सर्व उपस्थितांचं स्वागत केलं. ॲन श्वेता करंदीकर यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करून देताना सांगितलं की, सौ. शैलजा देशपांडे या व्यवसायानं इंटिरिअर डिझायनर आहेत. त्यांनी त्यांचा व्यवसाय चौदा वर्षे सांभाळला. २००० ते २०१४ या काळात त्यांनी 'किसान एक्झिबिशन प्रायव्हेट लिमिटेड'ची डायरेक्टरशिप सांभाळली. त्यांनी इकॉलॉजिकल सोसायटी मधून 'सस्टेनेबल मॅनेजमेंट ऑफ नॅचरल रिसोर्सेस अँड नेचर कॉन्झर्वेशन' हा कोर्स केला त्यानंतर त्यांच्या आयुष्याला कलाटणी मिळाली. २००९ पासून त्यांनी स्वतःला पर्यावरणासाठी वाहून घेतलं.


२०१४ पासून त्या 'जिवितनदी' संस्थेच्या सहसंस्थापिका आणि सहसंचालिका म्हणून काम पाहतात. त्या स्वतः घरात विषारीद्रव्यविरहित जीवनशैली अंगीकारतात आणि इतरांनाही तेच आवाहन करतात.

ॲन श्वेता करंदीकर पुढे म्हणाल्या,'ती माझी काकू आहे पण ती आमची फिलॉसॉफरही आहे आणि ती आमच्यासाठी एक रोल मॉडेल आहे.'

सौ. शैलजा देशपांडे यांनी व्याख्यानाची सुरुवात एक छोटी फिल्म दाखवून केली. त्यात त्यांनी सद्यपरिस्थिती लोकांच्या निदर्शनास आणण्याचा प्रयत्न केला.

मानव संस्कृतीत माणसानं भटकंती सोडून वसाहती निर्माण केल्या त्या नदीकाठीच... पुर्वेचं ऑक्सफर्ड आणि महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी अशी पुण्याची ओळख आहे. या पुण्यातली मुख्य नदी 'मुठा' हिचा मात्र शहराला विसर पडला आहे. नदी असूनही वाहतं पाणी, झाडं, किनारा यांतलं काहीच राहिलं नाही. इतकंच नव्हे तर नदीपात्रात बेकायदेशीर रस्ता बांधण्याचा प्रयत्नही मनपानं सुरू केला. मुठा नदीवरच्या चार धरणांपैकी पुण्याहून सात किलोमीटरवर असणाऱ्या खडकवासला धरणाची पाणी बाहेर टाकण्याची क्षमता सर्वांत जास्त आहे. पाऊस जास्त झाला किंवा

ढगफुटी झाली तर मुठेचं पात्र रौद्ररूप धारण करेल. तळजाईच्या डोंगरावरून येणाऱ्या पाण्याला नदीपात्रात टाकलेल्या भरावामुळं एकच छोटा मार्ग राहिला आहे त्यामुळं ते उलटं आत शिरेल आणि इमारती कोसळायला सुरुवात होईल. २०११ सालापासून या बेकायदेशीर रस्त्याला विरोध होऊ लागला तसंच 'राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणात' केस उभी राहिली. केस सुप्रीम कोर्टात गेल्यावर सुप्रीम कोर्टानं या रस्त्यासाठी टाकलेला भराव काढून टाकण्याचा आदेश दिला... आता रस्त्यासाठी टाकलेला भराव काढण्याचं काम सुरू झालंय. नदीजवळच्या इमारतीतल्या लोकांना असलेला पुराचा धोका टळला असला तरी अनेक प्रश्नांची उत्तरं अजून मिळालेली नाहीत. भराव घालणं आणि भराव काढणं यांत सामान्य लोकांचाच पैसा वापरला जातोय.




ही गंभीर परिस्थिती सामान्य लोकांपर्यंत पोहोचलेली नाही.

या फिल्मनंतर सौ. शैलजा देशपांडे यांनी 'नदी' हा विषय अधिक खोलात तरी सोप्या शब्दांत मांडण्याचा प्रयत्न केला. नदीकडे एक जिवंत व्यक्ती म्हणून बघण्याची गरज आहे असं मत त्यांनी व्यक्त केलं. पुण्यामध्ये अनेक नद्यांचे संगम आहेत. संगमांचं क्षेत्र हे पुण्यक्षेत्र मानलं जात म्हणून 'पुणे' हे नाव पडलं.

भारतात बारमाही वाहणाऱ्या नद्या तसेच पावसाच्या पाण्यावर अवलंबून असणाऱ्या नद्या असे नद्यांचे मुख्य दोन प्रकार आहेत. सह्याद्रीच्या नद्या एक कोटी ते अडीच कोटी वर्षं जुन्या आहेत तसंच त्या पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहेत. आठ महिने कमी पाणी असलेल्या नदीच्या प्रवाहाचा पावसात विस्तार होतो आणि नदी रौद्ररूप धारण करू शकते. बेकायदेशीर बांधकाम, जंगलतोड यांमुळं नद्यांचं अस्तित्व धोक्यात आलं आहे. ओहोळ आणि ओढे नदीसाठी साहाय्यक असतात. आपण जर डोंगरावर बांधकाम करायला लागलो तर हे ओढे बंद होतील.

नाद करते ती नदी. बेकायदेशीर बांधकामांमुळं आपण हा नादच बंद केला आहे.

नदीचं प्रदूषण हा एक अतिशय मोठा धोका आहे.

सकाळच्या टूथपेस्टपासून ते संध्याकाळच्या मॉसक्युटो फॉईलपर्यंत दिवसाला माणशी ४० ग्रॅम्स रसायनं वापरली जातात. ही रसायनं पाण्यात मिसळल्यानंतर प्रक्रिया करूनही ते पाणी पूर्णतः शुद्ध होऊच शकत नाही.

पुण्यात फक्त दैनंदिन वापरातून निर्माण होणारा सुमारे दोन लाख किलो कचरा नदीत मिसळतो. रुग्णालये, शेती, कारखाने यांतून निर्माण होणाऱ्या कचऱ्याचा यात समावेश केलेलाच नाही.

भारतात 'मोस्ट प्रोग्रेसिव्ह स्टेट' असणाऱ्या महाराष्ट्राला 'स्टेट ऑफ मोस्ट पोल्युटेड रिव्हर्स' असं संबोधलं तर गैर ठरणार नाही. प्रत्येकानं याचा गांभीर्यानं विचार करणं गरजेचं आहे. महाराष्ट्रातल्या एकोणपन्नास नद्या प्रदूषित आहेत. धरणांमुळे इथल्या नद्या चारच महिने वाहतात त्यामुळे हळूहळू समुद्राचं पाणी नदीत येतं. परिणामी खारपट जमिनी वाढत आहेत. नदीच्या उगमापासून ते नदी समुद्राला मिळेपर्यंत नदीचा विचार करावा लागतो. नद्यांचे प्रवाह, त्यांचे पूरक्षेत्र, नदीच्या प्रवाहाभोवतालची भौगोलिक परिस्थिती यांचा आपण विचारच केलेला नाही. हे शिक्षण लहानपणापासून द्यायला हवं.

विषारीद्रव्यविरहित जीवनशैली वापरून आपण साठ टक्के ते सत्तर टक्के नदी स्वच्छ करू शकतो.

नदीकाठी असणाऱ्या देवळांजवळ निर्माल्यखत प्रकल्प उभे केले तर नदीत कचरा टाकला जाणार नाही.

'माझी नदी माझी जबाबदारी' हे जर समाजानं ठरवलं तर काहीच अवघड नाही. 'वी डोन्ट इनहेरिट अर्थ फ्रॉम अवर एनसेस्टर्स. वी आर बॉरोईंग इट फ्रॉम अवर चिल्ड्रन. लेटस गिव्ह देम लिविंग रिव्हर्स.'

पुण्याला 'रिव्हर डिस्ट्रिक्ट' म्हणून घोषित करायला हवं म्हणजे नद्यांना पुरेशी जागा मिळेल.

'जिवितनदी' ही संस्था लोकांच्या सहभागातून नद्यांच्या संवर्धनासाठी प्रयत्न करते. आम्ही संस्थेतर्फे 'भारतीय नदी दिवस आणि नदी आठवडा' असे कार्यक्रम करतो. दर रविवारी नोंदणी करून 'रिव्हर वॉक आणि नेचर वॉक' आयोजित करतो त्यात नदीची सुरुवातीपासून आत्तापर्यंतची गोष्ट सांगतो.

'दत्तक घेऊ या नदीकिनारा' अशा योजनेतून नदी दत्तक घेऊन तिची काळजी घेण्याचं आवाहन करतो.

या कार्यात रोटरी तसंच इतर संस्था पुढाकार घेत आहेत. जास्तीत जास्त लोकांनी तसंच संस्थांनी या कार्यात सहभागी व्हावं असं आवाहन त्यांनी केलं.

रो. सुधांशू गोरे यांनी या महत्त्वाच्या कामाबद्दल सौ. शैलजा देशपांडे यांचं कौतुक केलं. रिव्हर वॉकमध्ये तसंच संस्थेच्या इतर कामात सहभागी व्हायला आवडेल असं सांगत भविष्यात त्यासाठी तुम्ही मार्गदर्शन करावं अशी त्यांना विनंती केली आणि या कामाची सविस्तर माहिती दिल्याबद्दल त्यांचे आभार मानले.

**व्हिडिओ इथे पाहा...**

## मेंबर्स ॲक्टिव्हिटी डे

दिनांक – २५ जानेवारी २०२१

मेंबर्स ॲक्टिव्हिटी डे (एम ए डी) हा कार्यक्रम पंचवीस तारखेला सेवासदन हॉलमध्ये संपन्न झाला. खूप दिवसांनी प्रत्यक्ष मीटिंग होत असल्यानं सुरुवातीपासूनच उत्साहाचं वातावरण होतं. फर्स्ट लेडी सुगंधानं सगळ्या ॲन्सना हळदीकुंकू समारंभासाठीही आमंत्रित केलं होतं. संध्याकाळी सात वाजता हळदी–कुंकू कार्यक्रम सुरू झाला. सगळ्या ॲन्स अगदी नटून–थटून आल्या होत्या.

रो. आनंद कुलकर्णी यांनी एम ए डी कार्यक्रमाचं सूत्रसंचालन केलं.

रो. अभिजीत देशपांडे आणि ॲन माधवी देशपांडे यांचा सुपुत्र ॲनेट आदित्य यानं हार्मोनिअमवर वाजवलेल्या नांदीनं एम ए डी कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानं वाजवलेल्या काही नाट्यगीतांनी आणि सतारीवर वाजवलेल्या गत





आणि गझल अशा मेलडीनं रसिकांची मनं जिंकली. कार्यक्रमात पुढं ॲन सई परांजपे यांची मुलाखत रो. योगेश नांदुरकर यांनी घेतली. सईच्या व्यावसायिक जीवनातले अनेक इंटरेस्टिंग पैलू या मुलाखतीत उलगडले. त्यानंतर रो. अभिजित देशपांडे यांनी उखाणे स्पर्धा घेतली त्यामध्ये ॲन्सनी विविध प्रकारचे उखाणे सादर केले. या स्पर्धेत ॲन यामिनी, रो. संगिता आणि रो. श्वेता यांना अनुक्रमे तिसरं, दुसरं आणि पहिलं अशी बक्षिसं मिळाली. अस्मिता आपटे यांनी या स्पर्धेचे परीक्षक म्हणून काम पाहिले.

त्यानंतर बुलेटीन टीमनी घेतलेल्या काव्यपूर्ती स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला यामध्ये तिसरं बक्षीस रो. श्वेता करंदीकर यांना, दुसरं बक्षीस ॲन गीतांजली पुरोहित आणि पहिलं बक्षीस ॲन लीना गोगटे यांना मिळालं. या सगळ्या कवितांचं सादरीकरणसुद्धा उत्तम प्रकारे झालं. स्पर्धेत सहभागी झालेल्या स्पर्धकांच्या सर्व कविता कलाकारी या सदरात वाचा. नुकत्याच झालेल्या एकांकिका स्पर्धेत सहभागी झालेल्या रोटरी क्लब पूणे साऊथच्या सगळ्या टीमला कार्यक्रमाच्या शेवटी गौरवण्यात आलं. रुचकर फेलोशिपनी कार्यक्रमाची सांगता झाली.

व्हिडिओ इथे पाहा...

➢ **क्लबच्या साप्ताहिक सभांचा सभेनुसार गोषवारा**

## साप्ताहिक सभा

**तुमचा लेख आवर्जून द्या...**
**समन्वयक**
**एके / यामिनी पोंक्षे**

# गोदान प्रोजेक्ट

**रो. प्रे. सुदर्शन नातू**

ऐकण्यासाठी क्लीक करा...

गोदान प्रोजेक्टमधल्या सात जानेवारीपर्यंतच्या उत्तुंग यशाचे रो.नितीन पाठक यांच्याइतकेच रोटरी क्लब पुणे साऊथचे माजी अध्यक्ष श्री. गोरे सर हेही भागीदार आहेत. सध्या गोरे सरांच्या मित्रमंडळींमुळंच हे शक्य झालं आहे. क्लबच्या सदस्यांव्यतिरिक्त अनेकांकडून या प्रोजेक्टला भरघोस आर्थिक सहकार्य मिळालं आहे हे विशेष... असं रो.नितीन पाठक यांनी सांगितलं.

रोटरी क्लब पुणे साऊथमधल्या फर्स्ट लेडी सुगंधा नातू, रो. माधुरी किरपेकर, ॲन सई परांजपे यांनी आर्थिक मदत केली आहे. आजचं गोदान आपले नवनिर्वाचित अध्यक्ष रो. रवींद्र प्रभुणे यांच्या आर्थिक मदतीनं झालं आहे.

सात जानेवारीपर्यंत अकरा गायींचं दान करण्यात आलं आहे. तीनचार गायी विकत घेण्यासाठी लागणारे पैसे तयार आहेत आणि गावातले गावकरी या उपक्रमात सहभागी होण्यासाठी खूप उत्सुक आहेत तसंच शेणापासून विविध वस्तू तयार करण्याचं प्रशिक्षण पुण्यातल्या कात्रज गोशाळेत गावातल्या पाच स्त्रियांना देण्यात येणार आहे.

सात जानेवारीला सकाळी 'अथश्री'मधले जवळपास तेरा जणं आणि रोटरी क्लब पुणे साऊथचे प्रेसिडेंट नॉमिनी रो. रवींद्र प्रभुणे, पीपी गोरे सर आणि रो. नितीन हे सगळे पासलीला गेले होते. रो.नितीनच्या प्रकल्पाला भेट, शेनवड गावाला आणि 'पाउलवाट फाउंडेशन'ला भेट, दुपारचं स्पेशल जेवण असा मस्त कार्यक्रम आखला होता. या वर्षात 'अथश्री'मधली जेष्ठ मंडळी आपल्या प्रोजेक्टमध्ये उत्साहानं सहभागी होत आपल्याला मदत करत आहेत. हे गोदान त्यांच्या हस्ते झालं



दहा जानेवारीला रो. विलास आपटे यांनी त्यांच्या वाढदिवसानिमित्त गोदान उपक्रमाला तीस हजार रुपयांची देणगी दिली. रो.प्रे. सुदर्शन नातू यांनी रो. विलास आणि ॲन अस्मिता यांचे आभार व्यक्त करून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

सतरा जानेवारीला अजून दोन गायींचं दान करण्यात आलं. तसंच सतरा जानेवारीला पीडीजी रो. दीपक शिकारपूर आणि त्यांचे सुपुत्र श्री. वेदव्रत यांनी गोदान प्रोजेक्टसाठी प्रत्येकी पंधरा हजार

रुपयांचे धनादेश रो.प्रे.सुदर्शन नातू यांच्याकडे सुपुर्द केले तसंच पीडीजी रो. दीपक शिकारपूर यांनी या प्रोजेक्टसाठी त्यांच्या मित्रांनासुद्धा आर्थिक मदतीचं आवाहन केलं आहे.

चोवीस जानेवारीला रोटरी क्लब पूणे साऊथनी तीन गायींचं दान केलं. या गोदानाचं वैशिष्ट्य म्हणजे दात्या श्रीमती सीमा सातोदकर यांनी गुरुजींच्या हस्ते विधिवत पूजा करून गोदान केलं. त्यांचे चिरंजीव श्री. तुषार हेही या वेळी उपस्थित होते. गावकरी सुद्धा उत्साहानं सहभागी झाले होते.



दुसऱ्या एका गोदान कार्यक्रमात दोन गायींचं दान रो. विलास आणि ॲन अस्मिता यांनी केलं. त्याकरता त्यांनी नुकतंच अनुदान दिलं होतं. चोवीस जानेवारीच्या गोदान कार्यक्रमाला रो. नितीन, पीपी रो. गोरे सर, रो. विलास आणि ॲन अस्मिता, फर्स्ट लेडी सुगंधा आणि प्रे.सुदर्शन नातू उपस्थित होते.

बारा डिसेंबर २०२० पासून आत्तापर्यंत रोटरी क्लब पूणे साऊथनी वीस गायींचं दान केलं आहे आणि यांचं श्रेय रो. नितीन आणि गोरे सर यांचं आहे. त्याचबरोबर या कार्यात रोटरी क्लब पूणे साऊथला शेनवड गावचे पाटील खूप मदत करतात.

पीपी रो. किरण पुरोहित यांनी त्यांचे वडील डॉ. मोरेश्वर पुरोहीत यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आणि रो. अजित फडके यांनी त्यांच्या पत्नीच्या वाढदिवसानिमित्त प्रत्येकी एक गाय दान करण्याचं जाहीर केलं आहे.

पन्नास गायींचं दान करण्याचं उद्दिष्ट रोटरी क्लब पुणे साऊथ साध्य करणार आहे.

## नाटक पाहावं करून

**रो. श्वेता करंदीकर**

ऐकण्यासाठी क्लीक करा...

‘घर पाहावं बांधून आणि नाटक पाहावं करून’ असं आपल्याकडं म्हणतात ते उगीच नाही... एकांकिका कशी उभी राहते तो पूर्ण प्रवास मला रोटरीच्या ‘आंतर रोटरी एकांकिका’ स्पर्धेच्या निमित्तानं अनुभवता आला. दरवर्षीप्रमाणं याही वर्षी रोटरी क्लब पुणे साऊथ एकांकिका स्पर्धेमध्ये उतरणार आहे असं दिवाळीच्या आसपास जाहीर झालं त्यासाठी दिग्दर्शक म्हणून आशुतोष नेर्लेकर यांना पाचारण करण्यात आलं. दिवाळीनंतरच्या आठवड्यात कलाप्रसाद

इथं एक प्राथमिक बैठक झाली आणि त्यानंतर रोटरी क्लब पुणे साऊथच्या सिंहगड रोडवरच्या ऑफिसमध्ये पहिली बैठक झाली. एकांकिकेत अभिनय करण्याची इच्छा असणाऱ्या सर्वांना तिथं बोलावलं होतं. वर्षा पानसरे लिखित ‘झाकोळ’ या एकांकिकेचं प्राथमिक वाचन करण्यात आलं. यथावकाश प्रत्येक जण कोणती भूमिका करणार आहे ते सगळ्यांना समजलं आणि तालमीची वेळ संध्याकाळी साडेसहा वाजताची ठरली.

सगळेजण तालमीसाठी वेळेवर येत होते. दिवसागणिक प्रत्येकाला एकांकिकेचा विषय आणि आशय अधिकाधिक समजून येत होता. मी तर कॉलेजच्या दिवसांनंतर प्रथमच नाटक करत होते. आमच्यापैकी बरेच जण स्टेजला सरावलेले होते. त्यातच आशुतोषजींनी माझ्यावर ‘साक्षी’ या मध्यवर्ती भूमिकेची जबाबदारी टाकली. मी त्यांना म्हणालेही ‘हे म्हणजे ‘पहिलीतल्या मुलाला दहावीचा अभ्यास दिल्यासारखं आहे...’ पण सर्वांनी मला वेळोवेळी मदत केली. आपापल्या सीनप्रमाणं सगळेजण प्रॅक्टिसला येऊ लागले... पण अजूनही त्याला एकांकिकेचा फील येत नव्हता. जेव्हा सगळयांचे सीन्स पाठांतरासहित, आवाजाच्या स्थित्यंतरांसहित आकाराला येऊ लागले तेव्हा मोठ्या जागेची गरज भासू लागली. रो. संजीव ओगले आणि ॲन स्नेहा ओगले यांनी त्यांचं टिळकरोडवरचं ऑफिस कलाकारांना उपलब्ध करून दिलं आणि मोठ्या जागेची सोय झाली. रो. आनंद बदामीकर आणि गोंदकरजी यांनी खुर्च्या आणून दिल्या आणि अस्मादिक जोमानं तालमीला लागलो.



नाटकाच्या तालमींच्या काळात अधूनमधून थोडी मजाही चालू होती. रो. जितेंद्र स्क्रिप्टची गरज म्हणून रोज न चुकता सामोसे घेऊन येत होता. एकंदरीतच नाटक बसवण्याची ती प्रक्रियाच एक अफलातून अनुभव वाटला. हळूहळू नाटकाची धुंदी चढत गेली आणि सगळेजण डिसेंबरच्या अखेरीपर्यंत आपापल्या भूमिकेत शिरले. जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात तालमीनं चांगलाच जोर धरला. सात जानेवारीला ‘भरत नाट्य मंदीर’मध्ये रंगीत तालीम ठरली आणि अकरा तारखेपासून सुरू होणाऱ्या एकांकिका स्पर्धेमध्ये एकांकिका सादर करण्यासाठी पहिल्या दिवसाचा म्हणजे अकरा जानेवारीचा शेवटचा स्लॉट रोटरी क्लब पुणे साऊथला मिळाला.

हे सगळं ठरत असताना सर्वांना वेळा देणं, सगळ्यांचं काटेकोर संयोजन करणं आशुतोषजींनी चालू ठेवलं होतं. त्यांची आणि प्रिया मॅडमची नाटकाविषयची तळमळ दिसून येत होती... पण सगळं नेहमीच सुरळीत होतं असं नाही. इथंही रो. किरण वेलणकर आणि रो. अनिल गोगटे यांना वैयक्तिक कारणांमुळं नाटकात सहभागी होता आलं नाही. त्यांची नाटकातली अनुपस्थिती आम्हाला कायमच जाणवली. तर रंगीत तालिमीची तयारी जोरात सुरू झाली... प्रॉपर्टीची जुळवाजुळव, कपडेपटाची जुळवाजुळव, संगीत, प्रकाशयोजना सगळं व्यवस्थित जमून आलं. प्रेसिडेंट रो. सुदर्शन नातू यांचा कायमच भक्कम पाठिंबा असतो. संयोजक म्हणून ॲन गौरी क्षीरसागर पदोपदी आपली भूमिका चोख बजावत होती. बॅकस्टेज सांभाळण्यासाठी प्रेसिडेंट सुदर्शन नातू, रो.अतुल अत्रे, रो.विलास आपटे, ॲन ऋचा नांदुरकर, ॲनेट श्रेया करंदीकर सरसावले. नाटकात भूमिका करणारे कलाकार म्हणजेच फर्स्ट लेडी सुगंधा, रो. जितेंद्र, ॲन अस्मिता, रो. योगेश, ॲन विशाखा, रो. संगीता, रो. मृदुला, ॲन गौरी, ॲनेट आरव सगळे सज्ज झाले. सात तारखेला रंगीत तालीम आणि अकरा तारखेला प्रयोग अतिशय चोख पार पडले.











कोरोनाच्या पार्श्वभूमीवर योग्य ती सगळी काळजी घेऊन स्पर्धा पार पडली. ज्यांना शक्य होतं ते एकांकिका बघायला आणि कलाकारांचा उत्साह वाढवायला आलेच होते. बाकीच्यांनी यू-ट्युब लिंकवरून एकांकिका पाहिली.

या स्पर्धेत रोटरी क्लब पुणे साऊथला बक्षीस मिळालं नाही. आमचेच काही मित्र आमच्यापेक्षा सरस ठरले. काही हरकत नाही. 'यशापेक्षा प्रयत्न सुंदर' या उक्तीप्रमाणं कलेचा आनंद सगळ्यांना घेता आला. यश कधी ना कधी तरी मिळेलच. पु. ल. म्हणतात त्याप्रमाणं 'हे एवढं मोठं नाटक जेव्हा उभं राहतं, तेव्हा त्या नाटकाला 'नाटक बसलं' असं का म्हणायचं?' ही नाटक उभं

करण्याची प्रक्रिया खूप जवळून अनुभवता आली, त्यातला आनंद लुटता आला, नवीन मित्रमैत्रिणींशी नातं दृढ करता आलं, फेलोशिपची मजा घेता आली याचा आनंद कायमच राहील.

शेवटी एवढंच म्हणेन

‘पुणे साऊथनी दिला अनुभव एक नवा
स्वानंद लाभूनी जीवा वाटे तो हवा हवा
नवी वाट जोखायला, नवे काही करायला
नवे क्षितिज दिसायला कारण ही एकांकिका’

खालील पेजवर प्रत्येक एकांकिकेची युट्युब लिंक दिली आहे.

**एकांकिका स्पर्धा व्हिडिओ इथे पाहा...**

**झाकोळ एकांकिका व्हिडिओ इथे पाहा...**

**बक्षीस समारंभाच्या कार्यक्रमाचा व्हिडिओ इथे पाहा...**

## असाही वाढदिवस...



रो. विलास आपटे ह्यांनी त्यांचा वाढदिवस आगळावेगळा साजरा केला. सकाळी एकांकिकेच्या प्रॅक्टिसच्या वेळी केक कापला आणि नंतर सर्व कलाकार मंडळींना कलाप्रसाद इथे दुपारी धुंधुरमास-स्पेशल अप्रतिम जेवण दिले.

वाढदिवसानिमित्त त्यांनी आपल्या गोदान उपक्रमाला दोन गायी दान करण्यासाठी रु.३०,०००/- ची देणगी दिली.

**क्लबकारी**

- **अध्यक्ष सुदर्शन संवाद**
- **विविध विभाग संचालक किंवा कमिटी मुख्य संवाद**
- **क्लबमधील विविध प्रोजेक्ट्स, कार्यक्रम, फेलोशिप्स**
- **जावे त्यांच्या क्षेत्रा.../ मागील एखाद्या प्रोजेक्टची गोष्ट**

**तुमचा लेख आवर्जून द्या....**
**समन्वयक**
**आनंद / यामिनी**

# काव्यपूर्ती स्पर्धा

बुलेटिन टीमतर्फे 'काव्यपूर्ती' स्पर्धा घेण्यात आली. 'पाहता पाहता मन मागे गेले दूर दूर नकळतच आला मग आठवणींचा पूर' या दोन ओळींनी सुरुवात करून कविता पुढे पूर्ण करायची होती.

कवी मोहन भट यांनी सर्व कवितांचं परीक्षण करून विजेत्या कविता जाहीर केल्या.

सर्व विजेत्यांचं हार्दिक अभिनंदन...

**प्रथम क्रमांक**

**'आठवांचा झुला'**

पाहता पाहता मन मागे गेले दूर दूर
नकळतच आला मग आठवणींचा पूर
तो सुम परिमळ ते हिंदोळे
बकुळ फुलांचा गंध दरवळे
भिजल्या माती मधे खेळलो
झाकिती डोळे हात कोवळे ।।
वात तेवता निरांजनातिल
मंद स्मित करी तो मुरलीधर
माळ ओढती जीर्ण हात, अन
आजीच्या ओठावर थरथर ।।
मी अजुनि बघते ते घर,
पाय ठेवते उंबरठ्यावर
वाकुनि बघते पुन्हा पुन्हा मग
होते माझे शैशव धूसर ।।
आठवणींच्या पुरात बुडते नयनांची नौका
ओढून आणते मीच तिला मग
कधी मारुनी हाका।।
मागे पडले ते सुंदर होते,
आजही आहे सुंदर सारे
हसुन सांगतो रम्य किनारा
सहजची मग तो पूर ओसरे ।।

– ॲन लीना अनिल गोगटे

**द्वितीय क्रमांक**

**मनगर्भ**

पाहता पाहता मन मागे गेले दूर दूर
नकळतच आला मग आठवणींचा पूर ।।
तुज ठाऊक नेमके मज काय काय आवडे
रंगीत खडू,काचा नी बिट्या कितिक होते जमविले ।।१।।
चोरून खाल्ले गाभुळ चिंचा,करवंदे आवळे नी बोरे
तू शबरी होऊन चिमणीच्या दाताने एकेक चाखलेले ।।२।।
तू दिलेले मोरपीस बघ पुस्तकात होते लपविले
स्पर्श त्याचा जादुई मनमोर माझा फुलविते ।।३।।
आठवते? तू दिली मज ओंजळभर बकुळ फुले
शुष्क तरी आजही मन स्मृतीसुगंधी नाहते ।।४।।
माळीलास मोगरी गजरा माझिया वेणीत तू
होते मी लाजले तेंव्हा अन विलसले गाली हसू ।।५।।
बॅरिस्टरी शिकण्यास तू मग गेला विलायतेला
तुझ्या सयीने रुमाल कितीदा भिजला रे प्रेमवेडा ।।६।।
येशील कधी परतून म्हणुनी सोसल्या रात्री किती
प्रार्थिली कीर्ती तुझी; तव नाम अंतरी गोंदले ।।७।।
तू अर्पिले देशास जीवन ; संसारी रमली मम काया
परी आज कळे मज का नुरे ही हरी वेगळी राधा ।।८।।

– ॲन डॉ. गीतांजली पुरोहित

## तृतीय क्रमांक

### 'आठवण – एक साठवण'

पाहता पाहता मन
मागे गेले दूर दूर
नकळतच आला मग
आठवणींचा पूर
आज दाटे माझ्या मनी
आठवांचेच काहूर
सुन्या माझ्या या जीवाला
अनामिक हुरहूर
किती साचले कळेना
माझ्या मनाच्या तळ्यात
काय दडे उमगेना
ओठाआडच्या हास्यात
काही जुन्या काही नव्या
तरी बऱ्या हव्या हव्या?
कटू काही गोड काही
आठवांना मोल नाही
आठवणी कशा अशा
मैत्रिणीच माझ्या जशा
त्यांची केली साठवण
गुंतवले माझे मन
– रो. श्वेता करंदीकर

## उत्तेजनार्थ

### काहूर

पाहता पाहता मन मागे गेले दूर दूर
नकळतच आला मग आठवणींचा पूर
ती धुंद रात्र ते रुणझुणते नूपूर
तो मद्याचा पेला त्यावर फेसाचा पूर
पाहता तो भावशून्य चेहरा भरून आले ऊर
ते निःशब्द डोळे बघूनी मनी दाटले काहूर
– रो. डॉ. सुभाष देशपांडे

### प्रेमाचा सूर

पाहता पाहता मन मागे गेले दूर दूर
नकळतच आला मग आठवणींचा पूर
असा कसा आटला प्रेमाचा अथांग सागर
ढगामागे जाऊन विरला सनईचा मंगल सूर
– ॲन विजया गुजराती

### हुरहूर

पाहता पाहता मन मागे गेले दूर दूर
नकळतच आला मग आठवणींचा पूर
पुरातच त्या शोधत बसले बालपणीचे सूर
सुरातूनी त्या गवसले मज गीत झंकार.
झंकाराच्या सुरेलतेने भरून गेला ऊर
उरात रूतल्या मधुर साठवणी सुंदर.
सुंदर साठवणींची शिदोरी लावी हुरहूर
हुरहुर लावूनी गेली सय दूर दूर.
दूर जाउनी फिरुनी आला आठवणींचा पूर
पुरातच त्या आठवणींनी परत मारला सूर.
– ॲन अस्मिता आपटे

## संगीताचं सामर्थ्य

### ॲन मोहिनी नातू

'सुखाची लिपी' या शांताराम आठवले यांच्या पुस्तकातल्या 'संगीताचं सामर्थ्य' या विषयीच्या लेखातल्या काही भागाचं ॲन मोहिनी नातू यांनी केलेलं वाचन...

ऐकण्यासाठी क्लीक करा...

## कलाकारी


- **सभासदांचा सहभाग वाढावा हा हेतू**
- **सभासदांच्या कलागुणांना वाव**
- **चित्रकला, फोटोग्राफी, कथा, लेख, कविता**
- **व्यक्तिगत, कौटुंबिक, व्यावसायिक गवसणी**

**तुमचा लेख आवर्जून द्या....**
**समन्वयक**
**आनंद कुलकर्णी / यामिनी पोंक्षे**

## *The India Way*

IPP Rtn. Abhijit Joag

Enjoy listening....




In a country, where Ramchandra Guha is considered a historian and Romila Thapar, who doesn't know Sanskrit, is called an 'Eminent Indologist', one rarely finds books written by real subject experts with a thorough understanding of the subject.

When S. Jaishankar, once our ambassador to USA and China and now our External Affairs Minister writes about India's geo-strategic imperatives, he brings to the table something more than the subject expertise - unique insights into the real politics that shape international diplomacy.

Mr Jaishankar has covered how India's foreign policy evolved over the years and what challenges and opportunities await us in the post-COVID, post-globalization, multipolar world.

While he dissects India's evolving diplomatic regime with laser-sharp analysis, he strictly avoids the temptation to score political brownie points, something one can't say about our so-called 'Public Intellectuals.' Having worked closely with the world's two superpowers, USA and China, his writing is highly insightful.

The brevity and preciseness of his style mean each sentence is packed with meaning and one has to maintain the focus while reading every word.

Reading this book, one hears the mind ticking behind India's current geo-strategic initiatives that have come as a refreshing reassurance, after a largely reactive track record. He captures the current thinking aptly when he writes, "Forging ahead will mean taking risks and refraining from passing off timidity as strategy and indecision as wisdom."

- सभासदांचा वेगवेगळ्या विषयांवरचे दृष्टिकोन मांडण्याची जागा...
- हलकंफुलकं लेखन हवं
- पुस्तंक, नाटक, चित्रपट, मालिका, वेबसिरीज
- राजकारण, समाजकारण, चालू घडामोडी

**दृष्टिकोन**

तुमचा लेख आवर्जून द्या...
समन्वयक
योगेंद्र नातू / अभिजित देशपांडे

## *The India Way*

IPP Rtn. Abhijit Joag




The District has organized special Event on 9th January 2021 for TRF donors to Annual Fund.

Foundation contributors from RCPS - Rtn. PP Dr Kiran, Rtn. President Sudarshan, Rtn. Sanjeev Ogale and Ann Sneha Ogale were felicitated at the hands of Rtn. DG Rashmi and DRFC Rtn. PDG Dr Girish Gune and other dignitaries.

Rtn. IPP Abhijit Joag graced the occasion. Thanks to all TRF donors from our club for your contributions. It's highly appreciated!

## *Donations*

| Sr. No. | Name of the Donor | Amount |
|---|---|---|
| 1 | Rtn. Madhuri Kirpekar | $100 |
| 2 | Ann Swati Shiralkar | $100 |
| 3 | Smt. Sumantai Rajhans | INR 10,000/- |
| 4 | Smt. Medha Ranade | INR 10,000/- |

**Donation for Periodic Table**

Rtn. Subhash Chauthai

Amount

INR 7,500/-

## Godaan Project

| Sr. No. | Name of the Donor | Amount in Rupees |
|---|---|---|
| 1 | Mr. Abhay Pangrekar | 5,000/- |
| 2 | Mrs Asavari Khare | 5,000/- |
| 3 | Smt. Meena Khire | 13,000/- |
| 4 | Rtn. Vilas and Ann Asmita Apte | 30,000/- |
| 5 | Mr. Deepak Shikarpur | 15,000/ |
| 6 | Mr. Vedvrat Shikarpur | 15,000/- |
| 7 | Mr. & Mrs. Jere | 25,000/- |
| 8 | Ann Sai Paranjape | 16,000/- |
| 9 | Rtn. Sudarshan Natu | 5,000/- |
| 10 | Mr. Milind Joshi | 11,001/- |
| 11 | Mr. Bhaskar Bhole | 16,000/- |
| 12 | Prof. Sharad Sane | 12,000/- |
| 13 | Mr. Madhusudan Sahasrabudhe | 14,000/- |
| 14 | Rtn. Ravindra Prabhune | 16,000/- |
| 15 | Mrs. Seema Satodkar | 12,000/- |

## मूलद्रव्य कोष्टक डोनेशन

रोटरी क्लब पुणे साऊथतर्फे दोन शाळांना मॉडर्न पिरिओडिक टेबल म्हणजे मूलद्रव्य कोष्टक किंवा आवर्तसारणी दिली जाणार आहे. त्याचबरोबर कोव्हीडमध्ये काळजी कशी घ्यावी, हात कसे धुवावेत यांचे फलक लावले जाणार आहेत. याकरता रोटरी क्लब पुणे साऊथ सर्व सदस्यांना प्रत्येकी साडेसात हजार रुपयांच्या आर्थिक मदतीचं आवाहन करत आहे. या बोर्डवर किंवा बाजूला डोनरचं नाव लिहिलं जाणार आहे.

आपल्याला आर्थिक मदत करायची इच्छा असल्यास रो. जितेंद्र महाजन किंवा रो. प्रे. सुदर्शन नातू यांच्याशी संपर्क साधावा.



## Congratulations!




Rtn. IPDG Ravee Dhotre received Rotary Public Image Award - Zonal in three categories - Social Media Award, Print Media Award and Impact Creating Project.

Congratulations!

## विशेष

- शुभेच्छा
- स्मृती
- गवसणी
- या महिन्यात मागच्या वर्षांत...

तुमचा लेख आवर्जून द्या...
समन्वयक
श्वेता करंदीकर

## टीम बुलेटिन

### सदरं

- मुखपृष्ठ ..........................श्वेता.............. विधानं/ कोट्स
- संपादकीय/ अध्यक्षीय........योगेश /सुदर्शन
- रोटरी..........................योगेंद्र / अभिजित............... रोटरी मंच/RI
- डिस्ट्रिक कनेक्ट...........योगेंद्र / अभिजित........ डिस्ट्रिक घडामोडी
- क्लबकारी.........................आनंद / यामिनी..........क्लब घडामोडी
- कलाकारी.........................आनंद / यामिनी..........सभासद गुणदर्शन
- दृष्टीकोन........................योगेंद्र / अभिजित..........पुस्तक, चित्रपट इ.
- विशेष..............................श्वेता.....................शुभेच्छा, स्मृती

- क्रिएटिव्ह असिस्टन्स आणि कोऑर्डिनेशन..........टीम सहयोगी